Maharashtra Times, Saturday, 9th July, 2011, Page No. 13



# शेवटच्या उड्डाणावर पावसाचे सावट

## अटलांटिस अंतराळयान होणार निवृत्त

**केप कॅनव्हेराल, फ्लोरिडा**

अमेरिकेचे अंतराळयान अटलांटिस आपले शेवटचे उड्डाण करण्यासाठी सज्ज झाले आहे. मात्र, या उड्डाणावर पावसाचे आणि धुळीच्या वादळाचे सावट असून, उड्डाण रद्द केले जाण्याची दाट शक्यता आहे.

अटलांटिसमध्ये इंधन भरण्याचे काम सुरु आहे. मात्र, पुन्हा एकदा हवामानाचा अंदाज घेतल्यानंतरच पुढील प्रक्रिया पार पाडायची की नाही, याचा निर्णय घेतला जाईल, असे नासाचे प्रवक्ते अलाईड ब्युटल यांनी म्हटले आहे. मात्र, कोणत्याही परिस्थितीत रविवारी किंवा सोमवारी, अटलांटिस निरोप द्यावाच लागेल. कारण, पुढील आठवड्यात एका मानवरहित अंतराळयानाचे प्रक्षेपण होणार आहे. त्यापूर्वी अटलांटिस रवाना न झाल्यास त्याला १६ जुलैपर्यंत थांबावे लागणार आहे. (वृत्तसंस्था)

- अटलांटिसमधून प्रवास करणारे अंतराळवीर - ४
- त्यातून नेल्या जाणाऱ्या सामानाचे वजन - ३६०० किलोग्रॅम
- शेवटचे उड्डाण पाहण्यासाठी प्रेक्षकांची अपेक्षित संख्या - ७.५ लाख
- डिस्कव्हरी आणि कोलंबियानंतर निवृत्त होणारे तिसरे अंतराळयान
- हे उड्डाण अटलांटिसचे ३३ वे, एकूण १३५ वे अंतराळ उड्डाण
- आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानकात थांबण्याचा कालावधी - तीन ते पाच वर्षे